# कोविड-१९

माहिती पुस्तिका

**संपादक**

**डॉ. रविंद्र झेंडे**, प्राध्यापक व विभाग प्रमुख,
पशुवैद्यकीय सामूहिक स्वास्थ्य विभाग

**डॉ. विलास वैद्य**, सहाय्यक प्राध्यापक,
पशुवैद्यकीय सामूहिक स्वास्थ्य विभाग

**डॉ. मनिष सावंत**, सहाय्यक प्राध्यापक,
पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विभाग

**मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय,
परळ, मुंबई – ४०००१२**

## प्रश्न. १ कोविड — १९ म्हणजे काय?

उत्तर: SARS-CoV- 2 या कोरोना विषाणूंमुळे होणाऱ्या आजाराचे नावं **कोविड —१९** हे आहे. कोरोना विषाणू हा आरएनए विषाणू आहे. कोरोनाचा अर्थ 'मुकुट' असा होतो. या विषाणूच्या स्निग्ध आवरणावर प्रथिनांची रचना आहे ज्यामुळे याला मुकुटासारखा आकार प्राप्त झाला आहे. म्हणून, कोरोना हे नाव दिले गेले.

डिसेंबर २०१९ मध्ये चीनच्या हुबे प्रांतात अज्ञात कारणांमुळे लोकांमध्ये फुफ्फुसाच्या दाहाचे विकार आढळून आले. चीन प्राधिकरणाने याचे कारण नवीन कोरोना विषाणू आहे असे सांगितले. त्यानंतर, जगातील सुमारे सर्व देशांमधून कोरोनाचे रुग्ण आढळल्याचे दिसून आले. त्यामुळे, जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) कोरोना व्हायरस डिसीज (कोविड—१९) यास ''महामारी आजार'' असे दिनांक ११ मार्च २०२० रोजी घोषित केले आहे.

## प्रश्न २ कोविड —१९ आजार कसा पसरतो?

उत्तर: विषाणूचा प्रसार प्रामुख्याने संक्रमित झालेल्या व्यक्तीच्या संपर्कात आल्याने होतो.

- जे लोक एकमेकांशी जवळपास संपर्क साधतात. (सुमारे ६ फूटांच्या आत)
- संक्रमित व्यक्तीला खोकला किंवा शिंक आल्यास नाक किंवा तोंडावाटे विषाणूबाधित स्त्राव बाहेर फेकला जातो.
- हा स्त्राव संक्रमित व्यक्तीच्या जवळ असणाऱ्या व्यक्तीच्या नाका व तोंडावाटे फुफ्फुसांमध्ये शिरकाव करतात.
- एखादी व्यक्ती विषाणू संसर्गत झालेल्या पृष्ठभागाच्या संपर्कात आल्यानंतर त्या व्यक्तीने तोंड, नाक किंवा डोळ्यांना स्पर्श केल्यावर कोविड—१९चा संसर्ग होतो आणि त्यानंतर तो कोविड —१९ इतरांना पसरण्यास कारणीभूत ठरतो.

## प्रश्न ३ कोविड —१९ आजार पाळीव प्राण्यांपासून माणसाला होतो काय?

उत्तर: कोरोना विषाणूमध्ये बरेच प्रकार आहेत. तरी आतापर्यंत उपलब्ध असलेल्या शास्त्रीय माहिती व पुराव्या आधारे या विषाणूची लागण पाळीव प्राण्यांपासून माणसाला झालेली दिसून आले नाही.

विविध तज्ञांच्या मते कोविड–१९ या आजाराचा प्रसार मुख्यत: चीन मधील वटवाघूळ या पक्षापासून माणसांमध्ये झाल्याचे आढळून आले.

**प्रश्न ४ कोविड–१९ ची माणसांमधील लक्षणे काय आहेत?**

उत्तर: कोविड–१९ हा आजार वेगवेगळया वयोगटातील लोकांमध्ये दिसून येतो. कोविड–१९ हा आजार श्वसन संस्थेशी संलग्न असून बहूतेक संक्रमित व्यक्तींमध्ये सौम्य ते मध्यम लक्षणे दिसून येतात. या आजारामध्ये लहान मुले व वयोवृध्द लोकांना जास्त प्रमाणात धोका असून वेळेत उपचार न केल्यास मृत्यू होण्याची जास्त संभावना असते.

सामान्य लक्षणांमध्ये ताप, थकवा व कोरडा खोकला आणि इतर लक्षणांमध्ये हे धाप लागणे, ठणका व वेदना, घसा खवखवणे आणि फारच थोड्या लोकांना अतिसार, मळमळ किंवा सर्दी असल्याचे दिसून येते.

**प्रश्न ५ पाळीव प्राण्यांमध्ये कोविड–१९ ची स्थिती कशी आहे?**

उत्तर: कोविड–१९ ने संक्रमित व्यक्तींच्या संपर्कात आल्याने काही मोजक्याच प्राण्यांना SARS - CoV-2 विषाणूची लागण झाल्याचे काही देशांमध्ये आढळून आल्याचे दिसून आले आहे.

**श्वान :**

हॉगकॉंग शहरांमध्ये कोविड–१९ची लागण होऊन दोन श्वान बाधित झाल्याचे समोर आले पण ही दोन्ही श्वानांमध्ये कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. दोन्ही श्वानांना कोरोना बाधित माणसांच्या संपर्कात आल्याने संसर्ग झाल्याचे निष्कर्ष आहेत. हॉगकॉंगच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, श्वानांपासून माणसाला किंवा माणसांपासून श्वानाला कोविड–१९ची बाधा झाली असल्याचा सध्या तरी एकही पुरावा उपलब्ध नाही.

**मांजर :**

बेल्जीअमध्ये काही मांजरांमध्ये कोविड–१९ या आजाराचे संक्रमण झाल्याचे निदर्शनास आले होते. अभ्यासानुसार असे दर्शवले आहे की, मांजरांना कोविड–१९ आजार होऊ शकतो आणि एका मांजरापासून दुसऱ्या मांजरामध्ये हा विषाणू पसरू शकतो. मांजर हे कोरोना विषाणूला संवेदनशील असल्याची माहिती वैज्ञानिक आणि पशुवैद्यकांनी दर्शवली आहे. परंतू मांजरापासून माणसांना कोविड–१९चा संसर्ग झाल्याचा अज्ञाप पुरावा उपलब्ध नाही.

**वाघ :**

न्यूयॉर्कमधील ब्रॉन्क्स प्राणिसंग्रहालयातील एका वाघाला पशुपालक कर्मचाऱ्यांमार्फत कोविड–१९ची बाधा झाल्याचे काही दिवसांपूर्वी समोर आले होते. तेथील वाघ श्वासाच्या विकाराने बाधित झाल्याचे लक्षात आल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी त्या प्राण्याचे नमुने तपासले आणि त्यात वाघाला कोविड–१९ची बाधा झाल्याचे दिसून आले. परंतू प्राणीसंग्रहालयातील इतर कोणतीही जनावरे संसर्गित झालेली आढळून आली नाहीत.

उपरोक्त प्राण्यांमध्ये अधिक प्रमाणात नमुन्यांचे परिक्षण करून कोविड–१९ या आजाराने संसर्गित झाली नसल्याचे निदर्शनास आले. अशाप्रकारे आतापर्यंत पाळीव प्राण्यांमध्ये या आजाराची लागण झाल्याची जगामध्ये एकही पुरावा उपलब्ध नाही.

**प्रश्न ६ माझा पाळीव प्राणी मला कोविड–१९ संक्रमित करू शकतो का?**

उत्तर: जागतिक आरोग्य संघटनेने (World Health Organisation) म्हटले आहे की, श्वान किंवा मांजरींसारख्या साथीदार /पाळीव प्राण्यांना नवीन कोरोना विषाणूचा संसर्ग किंवा प्रसार होण्याचा कोणताही पुरावा सध्या उपलब्ध नाही तसेच जागतिक प्राणी आरोग्य संघटनेने (World Organisation for Animal Health) देखील म्हटले आहे की, साथीदार प्राण्यांबद्दल कोविड–१९चे उपाय योजण्याची काहीही आवश्यकता वाटत नाही जेणेकरून त्यांच्या प्राणी कल्याणासाठी तडजोड ठरू शकतात.

आपण खूप सावध राहू इच्छित असल्यास, आपल्या घराबाहेरील इतर लोकांना आपल्या पाळीव प्राण्यांना यावेळी हाताळू देऊ नये. फक्त अपवाद आपल्या पाळीव प्राण्यांना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना आवश्यकता असल्यासच हाताळू द्यावे. आपल्या घराबाहेर असताना इतर लोकांपासून सामाजिक अंतर (सोशल डिस्टंसिंग) पाळावे. सामाजिक अंतर हे केवळ मानवी सदस्यांनाच नव्हे तर संपूर्ण घरात म्हणजेच प्राण्यांना देखील लागू होते.

पाळीव प्राणी किंवा इतर पशुधनांसह कोणताही प्राणी माणसांना कोविड–१९ संसर्ग पसरवू शकतो असा खात्रीलायक पुरावा सद्यस्थितीमध्ये आढळून आलेला नाही त्यामुळे पाळीव प्राणी असलेल्या लोकांनी मनामध्ये कोणत्याही प्रकारची भीती बाळगू नये.

**प्रश्न ७ मला कोविड–१९चे निदान झाल्यास मी माझ्या पाळीव प्राण्याचे रक्षण कसे करावे?**

उत्तर:
अशी शिफारस केली जाते की :

- कोविड–१९ मुळे आजारी असलेल्या व्यक्तीने स्वत:चे इतर लोकांपासून तसेच आपल्या पाळीव प्राण्यापासून १४ दिवस विलगीकरण करावे.
- शक्य असल्यास आपल्या घरातील एखाद्या निरोगी व्यक्तीस आपण आजारी असताना आपल्या प्राण्यांची काळजी घेण्यास सांगावे.
- आपण कोविड–१९चे रुग्ण आजारी असल्यास, पाळीव प्राण्यांना हाताळू नये, त्यांच्याशी खेळू नये व त्यांना संपर्कात येण्यापासून प्रतिबंध करावे.
- पाळीव प्राण्यांना खेळण्यास किंवा चाटण्यास प्रतिबंध करावा आणि अन्न सामायिक करणे यासह आपल्या पाळीव प्राण्याशी इतर संपर्क टाळावा.
- निरोगी व्यक्तीने हाताळण्यापुर्वी आणि हाताळण्यानंतर आपले हात साबणाने स्वच्छ धुवावे.

**प्रश्न ८ माझ्या पाळीव प्राण्यांनी सार्वजनिक ठिकाणी फेस मास्क घालावा का?**

उत्तर: पाळीव प्राण्यांना कोविड–१९ या आजाराची संसर्ग शक्यता फार कमी असून फेस मास्क लावल्याने पाळीव प्राण्यांना श्वास घेण्यास त्रास होवू शकतो म्हणून प्राण्यांना फेस मास्क घालू नये.

**प्रश्न ९ सद्यस्थितीत एखाद्या कुटुंबात पाळीव प्राणि असल्यास त्यांच्याशी कशाप्रकारे व्यवहार केला पाहिजे?**
उत्तर: जागतिक आरोग्य संघटना यांच्या सांगण्यानुसार, पाळीव प्राण्यांशी संपर्क साधल्यानंतर नेहमीच आपले हात साबणाने व पाण्याने स्वच्छ धुणे आवश्यक आहे.

- हात स्वच्छ धुतल्याने पाळीव प्राणी आणि मनुष्यामध्ये होऊ शकणाऱ्या ई–कोलाय आणि साल्मोनेलासारख्या सामान्य जीवाणूपासून देखील आपले संरक्षण होते .
- शिंकताना आपले तोंड आणि नाक पूर्णपणे झाकून ठेवावे जेणेकरून आपल्या पाळीव प्राण्याला कुठल्याही प्रकारचा संसर्ग होणार नाही.

- आपले हात साबणाने स्वच्छ धुवावे किंवा योग्य सॅनिटायझरचा वापर करावा.
- खोकला आणि शिंका येणाऱ्या लोकांपासून ठराविक अंतर ठेवा (कमीतकमी ६ फूट अंतर ठेवावे).

**प्रश्न १० जीवंत प्राणी किंवा प्राणिजन्य अन्नपदार्थांचा वापर करताना काय काळजी घ्यावी?**

उत्तर: कोविड—१९ विषाणूच्या उत्पत्तीविषयी अनिश्चितता असली तरीही जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या सल्ल्यानुसार, सामान्य खबरदारी म्हणून, थेट जनावरांच्या बाजारात किंवा मांस आणि मासळी बाजारात किंवा इतर प्राणिजन्य उत्पादनांच्या दुकानात जातांना, खालील स्वच्छताविषयक नियम पाळावेत .

- प्राणी आणि प्राणिजन्य अन्नपदार्थांना स्पर्श केल्यानंतर साबणाने व स्वच्छ पाण्याने नियमितपणे हात धुणे तसेच डोळे, नाक किंवा तोंड स्पर्श करणे टाळावे.
- आजारी जनावरांशी किंवा संसर्ग झालेल्या प्राणिजन्य उत्पादनांशी संपर्क टाळणे महत्वाचे आहे .
- शक्यतो, बाजारात राहणाऱ्या इतर प्राण्यांशी संपर्क टाळावा (उदा. भटके मांजरी आणि कुत्री, पक्षी) टाळावे.
- जनावरांचा कचरा किंवा प्राणिजन्य उत्पादनांना किंवा जनावरांच्या बाजारातील सुविधांच्या पृष्ठभागावरील द्रवपदार्थाचा संपर्क टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी.
- जागतिक आरोग्य संघटनेने संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी निदर्शीत केलेल्या मानक शिफारसींमध्ये नियमित हात धुणे, खोकला आणि शिंका आल्यास तोंड आणि नाक झाकणे फार महत्वाचे आहे .
- सर्वसाधारण चांगल्या अन्न सुरक्षा पद्धतीनुसार कच्चे मांस, दूध किंवा प्राणीजन्य पदार्थांना काळजीपूर्वक हाताळले पाहिजे, जेणेकरून ते शिजवलेल्या पदार्थांसह संभाव्य दूषित होऊ नये. चांगली स्वच्छता आणि अन्न सुरक्षा मानकानुसार तयार केलेले आणि बाजारात उपलब्ध असणारे मांस योग्य पध्दतीने शिजवून खाणे सुरक्षित असते.

**प्रश्न ११ श्वान आणि मांजरांसाठी कोविड–१९ ची लस आहे का?**

उत्तर : सध्यातरी माणसांना किंवा प्राण्यांसाठी कोविड–१९ ची कोणतीही लस उपलब्ध नाही.

पशुवैद्यक कोरोनाविषाणूशी परिचित आहेत. तत्सम कोरोनाविषाणूच्या प्रजाती पाळीव प्राण्यांमधील बऱ्याच सामान्य आजारांना कारणीभूत असतात. उदाहरणार्थ, बऱ्याच श्वानांना लहान (पिल्ले) असताना कॅनाईन कोरोनाविषाणूचे लसीकरण केले जाते. परंतु ही लस कोविड–१९ साठी संरक्षण देत नाही.

**प्रश्न १२ कोविड–१९पासून स्वत:ला, आपल्या कुटुंबाला तसेच पाळीव प्राण्यांना कसे वाचवावे?**

उत्तर: कोविड–१९या आजारापासून प्रतिबंध करण्यासाठी खालील गोष्टी सावधगिरीने पाळाव्यात:–

- साबणाने २० सेकंद हात धुवावे. जर साबण आणि पाणी उपलब्ध नसेल तर ६०–९५ टक्के अल्कोहोल आधारित सॅनिटाईझर वापरावे.
- नाकाला,चेहऱ्यावर, डोळ्यांना वारंवार स्पर्श करू नये.
- आजारी माणसांपासून दूर राहावे आणि आपण आजारी पडल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने स्वत:चे इतरांपासून विलगीकरण करावे.
- खोकताना आणि शिंकताना तोंडाला रुमाल किंवा स्वच्छ कपड्याचा वापर करावा.
- जर तुम्हाला श्वास घेण्यास त्रास होत असेल आणि सौम्य सर्दी–ताप असेल तर चोवीस तास कोणतेही औषध न घेता घरी थांबा आणि जवळच्या रूग्णलयात तपासणी करून घ्यावी.
- जर कोविड–१९ची लागण झाली असेल तर स्वत:हून नजिकच्या रूग्णलयात जावून तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेवून त्वरीत उपचार घ्यावेत.
- जर तुमच्या पाळीव प्राण्याला चिकित्सेची गरज असेल तर जवळच्या पशुचिकित्सालयात दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा आणि पशुवैद्यकाच्या सल्ल्याने पुढील कार्यवाही करा.
- जर तुम्ही आजारी असाल तर तुमच्या पाळीव प्राण्यांची काळजी घेण्यासाठी कुटुंबातील दुसऱ्या निरोगी व्यक्तीची मदत घ्यावी आणि दोन

आठवडयांचे खाद्य आणि औषधांचा साठा तुमच्या पाळीव प्राण्यासाठी करून ठेवावा.

***(टिप:*** *सदर माहिती हि खालील संकेतस्थळांवर उपलब्ध माहितीच्या आधारे संकलित केलेली असल्याने अधिक माहितीसाठी पुढील संकेतस्थळांना भेट द्यावी.)*

www.who.int, www.oie.int, www.ncdc.gov.in, www.mohfw.gov.in